


# वेगळी वाट

**घराणेशाही आणि परंपरा या चौकटीत स्वतःला बंदिस्त न करता, डॉ. अशोक रानडे संगीताच्या क्षेत्रात स्वच्छंद वावरले. त्यामुळेच त्यांना आगळेवेगळे पेश करता आले. त्यांच्या वाटचालीचा हा धावता आढावा....**

**मधुवंती सप्रे**

**या** जगात येताना माणूस बरोबर काय घेऊन येतो ? बुध्दी, नशीब, अनुवंशिकता की यातलं काहीच नाही ? काही माणसं अशी असतात, की त्यांचं कर्तृत्व, त्यांची वेगवेगळ्या विषयातली नेत्रदीपक कामगिरी, संशोधन, अभ्यास, सर्जनशीलता, पार कळसापर्यंत पोचणारी प्रतिभा, त्यातून स्वतःच कळस होण्याची उत्तुंग झेप - हे सर्व पाह्यलं की काही कळेनासं होतं. या माणसाला कोणत्या मापदंडाने मापावं बरं ? का कोणत्याच मोजपट्ट्या वापरूच नयेत ? त्याचे व्यक्तित्व जसं भावेल तसं आकारत जावं हेच खरं !

मुंबईच्या टाटा थिएटरमध्ये 'देवगाणी,' 'बैठकीची लावणी' हे पूर्णतयः वेगळ्या धर्तीचे कार्यक्रम अनेकांनी आवर्जून पाहिले, तसे मीही पाहिले, ऐकले. त्या कार्यक्रमांचं कर्तेपण डॉ. अशोक रानडे यांचे आहे हे जाणवलं, समजलं. पण त्या कर्तेपणामागे इतक्या वर्षांचं संशोधन, विचार, मेहनत, ठाम दृष्टिकोन, परंपरेचं सांगणं शोधून काढण्याची कलात्मक दृष्टी असेल याचा सुगावा लागला नव्हता. कार्यक्रम पहाताना डॉ.रानडे यांनी दिलेले संदर्भ व केलेलं निरूपण ऐकताना मात्र आत कुठेतरी जाणवत होतं, की हे काही वेगळंच आहे.

★★★★

डॉ.अशोक दामोदर रानडे, जन्म २५ ऑक्टोबर १९३७ चा. आईवडील दोघांकडूनही संगीताचा वारसा निर्मळ झऱ्यासारखा लाभला. वडिलांना तबल्याची आवड होती तर आईचे भाऊ - प्रसिध्द गायक लक्ष्मणराव बोडस. त्यामुळे रानडे यांना गाण्याची आवड मुळात होतीच. वडिलांनी मग त्यांना दहाव्या वर्षीच गाणं शिकवायला गजानराव जोशींकडे नेलं. आपण गावे, ख्याल गायन करावे असे रानडे यांना वाटू लागले. शाळेचा अभ्यास आणि गाण्याची तालीम यात दिवसरात्रीचे तास धुंगुरासारखे बांधले गेले.

सतत गाणं ऐकणं हा संस्कार, गाणं शिकण्यापेक्षा मोठा होता. दादर माटुंगा कल्चरल सेंटर, देवधर स्कूल इथे गाण्याचे, वादनाचे कार्यक्रम शनिवार- रविवार चालत. रेडिओ तेव्हा एकमेव साधन होतं. सतत संगीताचं वातावरण, शास्त्रीय गायन आणि त्या संबंधीच्या गोष्टी. आख्यायिका हेच कानांवर पडत राहिलं.

गजानराव जोशी हे व्हायोलिन वादक आणि गायक त्यांना नाट्यसंगीताची खूप आवड. त्यामुळे बालगंधर्व, मा.कृष्णराव, फैय्याजखाँसाहेब अशा मोठ्या कलावंतांचं ऐकायला मिळालं. पटवर्धनबुवा, आफळेबुवा इत्यादींची कीर्तने ऐकणे असं चहुबाजूंनी संगीताचं रान घनदाट झालेलं. त्यात रानडे मनसोक्त विहार करीत होते. गुरूमुखातून आलेलं गाणं शिकणं, ऐकणं, रियाज करणं आणि शाळेचा अभ्यास. अभ्यासाबरोबर गाणं आणि गाण्याबरोबर अभ्यास करणं बालवयातच मनात मुरत गेलं.

**'धंदा' करावयाचा नाही !**

डॉ.रानडे म्हणाले, 'मी मॅट्रिकला असतानाच एक निर्णय घेऊन टाकला. गाणं शिकायचं. ते पूर्ण आत्मसात करायचं. पण गाण्याचा धंदा करायचा नाही. त्यावरती पोट अवलंबून ठेवायचं नाही.''

डॉ.रानडे यांना ज्या पध्दतीने काम करायचे होते, त्यात संगीत, साहित्य, नाटक या तिन्ही गोष्टी केंद्रीभूत होत्या. गाण्यामुळे चित्रपट पहाणं मात्र फारसं महत्त्वाचं नव्हतंच. परंतु आज दृकश्राव्य माध्यम आवडतं. त्या वयात गाणं आणि अभ्यास यात वेळच पुरत नसे. त्याची उणीव नंतरच्या काळात भरून निघाली.

गाण्याच्या परीक्षा नव्हत्या. गुरूकुल पध्दतीनेच ते शिकले. नुसते अस्ताई- अंतरे शिकायलाच पहिली तीन वर्षे गेली. तंबोरा वाजवायचा, ठेका धरायचा. मग गायला सुरुवात झाली.

पहिली दहाबारा वर्षे गजाननबुवांकडे गाणं शिकले. नंतर गजाननबुवांना इंदूरला जावे लागले. त्यामुळे रानडे आपले मामा लक्ष्मणराव बोडस यांच्याकडे गाणे शिकले. नंतर मावशीचे यजमान प्रल्हाद गानु यांच्याकडे गाणे शिकले. मग प्रो. बी.आर.देवधर हे गुरू लाभले.

देवधरांकडे आवाज साधनाशास्त्र (व्हॉईटसकल्चर) शिकायला गेलेले रानडे हे पहिले विद्यार्थी. त्यांना पहाताच देवधर म्हणाले - ''मी अमेरिकेहून व्हाईसकल्चर शिकून आलो, त्याला वीस वर्षं लोटली आणि आज तू पहिला विद्यार्थी आलास !''

गाणं शिकायचं ते पूर्ण तयारीनीशी. तो जरी व्यवसाय करायचा नसला तरी गाणं उत्तम कळलं पाहिजे. दुसरा काय गातो ते समजलं पाहिजे. स्वरांचं साम्राज्य आत्मसात झालं पाहिजे हा दृष्टिकोन त्यांनी बाळगला. आजतागायत त्यांचा गाण्याचा रियाज चालू आहे.

**अर्थशास्त्राचे पदवीधर**

गाण्याबरोबर महाविद्यालयीन शिक्षण चालू

होतं. त्यांना शिक्षणातल्या अत्युच्च पदव्या हव्या होता, त्या नोकरीसाठी. त्यादृष्टीने उपयुक्त म्हणून अर्थशास्त्रात रानडे यांनी पदवी संपादन केली. वडील बँकेत नोकरी करीत. त्यांचं संस्कृत उत्तम होतं. कवितेची आवड. जुनी काव्ये मुखोद्गत होती. त्याचाही साहित्यिक संस्कार रानडे यांच्यावर झाला. मग मराठी आणि इंग्रजी घेऊन त्यांनी एम.ए. केले. नंतर एल.एल.बी. सुध्दा केले. नोकरी करणं क्रमप्राप्तच होतं. आकाशवाणी मुंबई केंद्रावर ड्युटी ऑफिसरची नोकरी मिळाली.

आकाशवाणीवर असतानाच रानडे यांना वाटू लागलं पीच.डी. करावं. डोळ्यासमोर संगीत आणि समीक्षा हे विषय होते. वा.ल. कुलकर्णी यांनी सांगितलं. रा.भा. पाटणकरांना भेट! तेथे प्रथम विषयाची चर्चा मग कामाला सुरुवात. यातही पुन्हा गंमती झाल्याच -

इंग्रजी समीक्षेचा मराठी समीक्षेवर पडलेला प्रभाव यावरती दीड वर्ष काम केलं. ध्वनी थिअरी, म्युझिक इन शेक्सपिअर, संगीताचे सौंदर्य शास्त्र यावरतीही काम सुरू होतं. भाषणं, लेखन असं चालू होतं. संगीताबद्दलची समीक्षा समाधान करू शकत नाही, असं रानडे यांना वाटायला लागलं. त्यामुळे ते कधी कधी वादही घालीत. पीएच.डी. साठीचे काम चालू असताना, पाटणकर रानडे यांना म्हणाला, ''तू पीएच.डी. करूच नको. त्यापेक्षा संगीताचं सौंदर्यशास्त्र यासंबंधी तू लेखन कर!''

मग रानडे स्वतःचे विचार शब्दबध्द करू लागले. त्यात स्वर - मूलभूत संकल्पना, लय - मूलभूत संकल्पना, भारतीय संगीतातली धराणी, संगीतप्रकार यासंबंधी शास्त्रशुध्द विचार त्यांनी मांडले. लेखनाचे पहिले दोन खर्डे पाटणकरांनी फाडायला लावले. रानडे यांनी प्रथम व्याख्याने द्यावीत, असं त्यांनी सुचवलं.

वरील विषयावर १९६७ साली चार व्याख्याने महाविद्यालयात दिली. मुळात ही व्याख्याने इंग्रजीतून दिली. परंतु प्रभाकर पाध्ये यांच्या 'सेंटर फॉर इंडियन रायटर्स' तर्फे तीन व्याख्याने पुण्याला मराठीतून दिली. मग त्यातूनच 'संगीताचे सौंदर्यशास्त्र' हे पुस्तक तयार झाले. अशोक रानडे म्हणतात- 'रा.भा.पाटणकरांनी मार्गदर्शन आणि उत्तेजन दिलं नसतं तर माझे विचार नोंदवण्याची इच्छा तरी झाली असती की नाही कोण जाणे?''

साहित्य-संस्कृती-संगीत या बरोबरच थिएटरंच आकर्षण होतं. यातूनच नाटकाना संगीत देण्याची प्रेरणा मिळाली. माता द्रौपदी, देवजीने करूणा केली. संध्या छाया, टेम्प्ट मी नॉट अशी वेगवेगळी नाटके केली.

### संगीत विभागाचे संचालक

पु.ल.देशपांडे, वामनराव देशपांडे, प्रिं.ढेकणे यांनी मुंबई विद्यापीठात संगीत विभाग व्हावा म्हणून प्रयत्न सुरू केले होते. १९६७ पासून विभाग सुरू झाला. त्याचे पहिले संचालक म्हणून डॉ. अशोक रानडे यांची नेमणूक झाली. नेमणूक करतानाच असं ठरलं की आधी काहीही न ठरवता, संचालकाला त्याच्या मर्जीप्रमाणे काम करू द्यावं. त्यामुळे पहिले आठ महिने संगीतशिक्षणपध्दती कशी राबवायची यासाठी रानडे अभ्यासक्रम तयार करीत होते. त्यात मग विद्यार्थ्यांना ध्वनीमुद्रण कथाही उपलब्ध झाल्या. १९६८ ते १९८३ रानडे इथे कार्यरत होते.

१९८३ साठी आणखी एक संधी चालून आली. ती म्हणजे अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन स्टडीज्' यांनी अर्काईव्हज अँड रिसर्च सेंटर फॉर एथनोम्युझिकॉलॉजी' असं सेंटर काढायचं ठरवलं. तिथे अशोक रानडे यांना असोशिएट डायरेक्टर म्हणून नेमण्यात आलं.

पुणे, बनारस, दिल्ली इथे त्यांची कार्यालये होती. जोपर्यंत पुण्यात काम करायचं होतं. तोपर्यंत, म्हणजे वर्ष दीडवर्षे रानडे तिथे होते. पुढे त्यांची नेमणूक दिल्ली येथे झाली, तेव्हा मात्र आपलं कार्यक्षेत्र मुंबईच आहे हे लक्षात घेऊन त्यांनी ते पद सोडलं.

आणखी एक संधी चालून आली. ती म्हणजे राष्ट्रीय संगीत नाट्य केंद्र (एन.सी.पी.ए.) इथे १९८४ साली ते डेप्युटी डायरेक्टर म्हणून ते रूजू झाले. ते ऑगस्ट १९९३ पर्यंत आणि आता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्रात सांस्कृतिक विभागाचे संचालक म्हणून मार्च ९४ पासून त्यांचं काम सुरू आहे.

### नाट्यसंगीताचा प्रयोग

डॉ. अशोक रानडे यांनी नाटकांना दिलेलं संगीत हाही एक प्रयोग होता किंवा आहे. रानडे म्हणाले,'' संगीत आणि नाटक (अभिनय) या दोन कला एकत्र येतात, तेव्हा प्रयोगकला एकमेकीत मिसळून जातात हे चुकीचं मत आहे. सेंद्रीय एकात्मता वगैरे बरोबर नाही तर या दोन्ही कला समांतर जुळणी उभ्या करतात.

नाट्यगीतं सादर करताना लोकप्रिय गाणं घ्यायचं नाही, बालगंधर्व आणि दीनानाथ वगळून नाट्यपदं सादर करायची असा रानडे यांचा कटाक्ष होता. त्यासाठी संशोधन करून, नाट्यगीतं निवडून त्यांच्या चाली कलाकारांकडून बसवून घेतल्या. रानडे म्हणाले- ''नाट्यसंगीताचं मराठी वळण लक्षात घेताना हिंदी, फारसी, बंगाली, गुजराथी रंगभूमीचे नमुने माझ्याकडे आहेत. त्यांचा या कार्यक्रमासाठी उपयोग होतो. प्रेक्षकही, ठाऊक नसलेली नाट्यगीते ऐकून आनंदित होतोत.

### बैठकीची लावणी आणि देवगाणी

**बैठकीची लावणी :** - हा कार्यक्रम सादर करण्यापूर्वीच 'लोकसंगीत शास्त्र' हे पुस्तक १९७५ साठी प्रसिध्द झाले होते. डॉ.रानडे म्हणाले, ''तमासगीरांबरोबर माझा वीस वर्षाचा परिचय त्यांची मी ध्वनिमुद्रणं केली आणि पंधरा वर्षांनी ठरवलं की कार्यक्रम करायचा. नवीन वेगळं काही द्यायचं. काही जुन्या चाली घेतल्या. काही नवीन चाली केल्या. लावणीरचनेचा उद्देश आणि ती शैली आत्मसात झाली असं मी केव्हा म्हणतो? तर त्यात मी चाली बांधू शकतो तेव्हा! हिंदुस्तानी ठुमरीचे बाज म्हणजे ही लावणी होते.

**देवगाणी:** - यात धर्मसंगीत येते. भक्ती हा एक पंथ आहे. आरत्यांच्या एकूण चौपन्न चाली गला सापडल्या. प्रत्यक्ष व्यवहारात चौदा चाली रुढ आहेत. म्हणजे परत शोधणं आलंच.

आपल्या परंपरेत सर्व काही अंतर्भूत आहे. फक्त ते शोधून काढलं पाहिजे. या ठाम कल्पनेने डॉ.रानडे झपाटलेले आहेत. नुसतं संशोधन करून न थांबता, त्या नाट्यसंगीताला पैलू पाडून त्याचं झळाळतं स्वरूप ते देशात-परदेशात मांडीत असतात. डॉ.रानडे हसत हसत म्हणतात- ''वीस वर्षे चाल गुरूकडे गाणं शिकलो, त्यामुळे माझ्याकडचा खजिना कधी रिकामा होत नाही.''